# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था )

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे -४११ ००१.

Email : bartidelhi19@gmail.com Website : http//:barti.maharashtra.gov.in

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील ३०० उमेदवारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या (पूर्व व मुख्य) पूर्वतयारी प्रशिक्षणासाठी पुरस्कृत (Sponsor) करण्यात येत आहे. उमेदवारांची निवड करण्याकरिता **दि. २७ ऑगस्ट २०२३** रोजी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) आयोजित करण्यात येत असून त्याकरिता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. **इच्छुक पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी** **www.siac.org.in या संकेतस्थळास भेट द्यावी.**

**ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी - दि. १४ जुलै २०२३ ते १४ ऑगस्ट २०२३**

योजनेच्या अधिक माहितीसाठी **http://barti.maharashtra.gov.in >NOTICE BOARD > Delhi-UPSC-2024- ADVT and GUIDELINES** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

(सुनिल वारे)

**महासंचालक, बार्टी,पुणे**

**Advt./UPSC2024/14.07.2023**

महाराष्ट्र शासन

# राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई

## नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ साठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) बाबत जाहिरात

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC) मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्यासह यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (YASHADA) संचालित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (ACEC) पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (BARTI) पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचालित सावित्रीबाई फुले अॅकॅडमी, पुणे, अंबरनाथ नगरपालिका संचालित युपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र (UPSCCETC) अंबरनाथ ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था (CDIAC) ठाणे यांचेमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२४ साठी पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून सर्व शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक :**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाइन अर्ज | दि. १४.०७.२०२३ (पासून) |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १४.०८.२०२३ (पर्यंत) |
| ३ | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १५.०८.२०२३ |
| ४ | लेखी प्रवेश परीक्षा दिनांक | दि. २७.०८.२०२३ |

**टीप :**

१. विद्यार्थ्यांना प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील प्राप्त गुण व त्यांनी प्रशिक्षण केंद्रासाठी दिलेला विकल्प या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. लेखी परीक्षेनंतर मुलाखतीचे वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले जाईल.

२. सामायिक प्रवेश परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रवेश पोर्टलवर लॉग इन करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

३. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिकरित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहिती SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.

**सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाइन अर्ज भरण्याविषयी सूचना शासनामार्फत दिले जाणारे विद्यावेतन व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**दिनांक : ११.०७.२०२३**
**स्थळ : मुंबई**

**सही/-**
**डॉ. स्वाती वाव्हळ**
**संचालक, SIAC, मुंबई**
**समन्वयक, सामायिक प्रवेश परीक्षा**

डीजीआयपीआर/२०२३-२४/२०७९

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

## दिल्ली येथील नामांकित कोचिंग संस्थेमध्ये संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षा-२०२४ साठी प्रशिक्षण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत दिल्ली येथील नामांकित प्रशिक्षण संस्थेमध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेसाठी नि:शुल्क अनिवासी प्रशिक्षण (कोचिंग) राबविण्यात येणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांसाठी प्रवेश परीक्षेचा ऑनलाईन अर्ज, परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षेची माहिती इ. ची माहिती राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. **इच्छुक पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी www.siac.org.in या संकेतस्थळास भेट द्यावी.**

**प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज | दि. १४ जुलै २०२३ (पासून) |
| अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. १४ ऑगस्ट २०२३ (पर्यंत) |
| लेखी प्रवेश परीक्षा दिनांक | दि. २७ ऑगस्ट २०२३ |

दिल्ली येथील युपीएससी परीक्षेच्या पूर्व तयारी प्रशिक्षणासाठी अनुसूचित जातीच्या ३०० उमेदवारांची निवड करण्यात येईल. त्यामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी, ४ टक्के जागा “दिव्यांग” असलेल्या व्यक्तींसाठी (Person With Disability), ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी इ.) विद्यार्थ्यांकरिता आरक्षित असतील, एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**पात्रता :-**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३) उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.
४) उमेदवाराचे वय संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या अटी व शर्ती नुसार असावे.
५) संघ लोकसेवा आयोगामार्फत सन २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी पात्र असावा.
**६)** रु. ८ लाखापर्यंत कौटुंबिक उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

**प्रशिक्षणा दरम्यान देण्यात येणारे लाभाचे स्वरूप :-**

१) बार्टी संस्थेमार्फत दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षण शुल्क देण्यात येते.

२) सदर प्रशिक्षण अनिवासी असल्याने उमेदवारांना दिल्ली येथील निवास व भोजनाची व्यवस्थेकरिता प्रती माह कमाल रक्कम रु.१३०००/- विद्यावेतन देण्यात येते. विद्यावेतन करिता विद्यार्थ्यांची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येईल.

३) प्रशिक्षणाच्या सुरवातीस दिल्ली येथे जाण्याकरिता रु. ५०००/-(एकदा) व प्रशिक्षण संपल्यानंतर परतीच्या प्रवासाकरिता रु. ५०००/- (एकदा) प्रवास खर्च देण्यात येतो.

४) पहिल्या महिन्यातील आर्थिक सहाय्य रु. ३०००/- (एकरकमी)

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :-**

१) **प्रशिक्षणाचा कालावधी-** दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेने सदर बॅचसाठी घोषित केलेला समाप्तीचा दिनांक अथवा १२ महीने यापैकी आधी जी बाब पूर्ण होईल, त्या तारखेला प्रशिक्षण समाप्त होईल.

२) **निवड प्रक्रिया** - राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्याप्रमाणे निवड प्रक्रिया राहील.

३) प्रशिक्षणास रुजू झाल्यानंतर बायोमेट्रिक हजेरीच्या आधारे व संबधित प्रशिक्षण संस्थेकडून प्रत्येक महिन्याचे उपस्थिती पत्रक प्राप्त झाल्यावरच विद्यावेतन अदा करण्यात येईल. प्रशिक्षणास दरमहा ७५ टक्केपेक्षा जास्त उपस्थित असेल त्या विद्यार्थ्यांना दरमहा रुपये १३०००/- विद्यावेतन देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी कोचिंग क्लासला उपस्थित न रहाता बार्टीकडे विद्यावेतनाकरिता दबाव आणल्यास विद्यार्थ्यास प्रशिक्षणाकरिता अपात्र ठरविले जाईल.

४) विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेकडून शैक्षणिक साहित्य व टेस्ट सिरीज (ऑनलाईन/ऑफलाईन) देण्यात येतील.

५) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.

६) ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी मार्फत राबविल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोग - नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण (उदा. यशदा, Pre-IAS केंद्र व SIAC, दिल्ली येथील प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्यातील प्रशिक्षण) घेतले आहे असे उमेदवार अर्ज करण्यास अपात्र आहेत. यापूर्वी उमेदवाराने बार्टीच्या प्रशिक्षणाचा लाभ घेतला असल्यास संबधित उमेदवाराची प्रशिक्षणातील उमेदवारी रद्द करण्यात येईल.

७) उमेदवाराचे प्रवेश परीक्षेतील गुण व संबंधित कोचिंग क्लासमधील उपलब्ध प्रवेश क्षमता यांच्या आधारे विद्यार्थ्यांना क्लासमध्ये रुजू केले जाईल.

८) निवडण्यात आलेल्या कोचिंग क्लासमध्ये GS, CSAT आणि वैकल्पिक विषय यांचे एकत्रित प्रशिक्षण घेणे विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे. वैकल्पिक विषयासाठी बार्टीमार्फत निवडण्यात न आलेल्या एखाद्या कोचिंग क्लासचा विद्यार्थ्यांनी आग्रह धरल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाही.

९) बार्टी संस्थेने निवडलेल्या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये घोषित केलेल्या तारखेस उमेदवाराने रुजू होणे बंधनकारक राहील. जे उमेदवार विहित मुदतीमध्ये दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थेमध्ये रुजू होणार नाहीत, अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल. त्या रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड घोषित करण्यात येईल.

१०) निवड झालेल्या उमेदवारांना बार्टी संस्थेसोबत रु. १०० च्या स्टँपपेपरवर प्रशिक्षणातील अटी व नियमांच्या पालनाबाबतचा करार करावा लागेल. करारनामा सही करतेवेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. कागदपत्रांची पडताळणी ही पुणे येथे करण्यात येईल. जर निवड यादीतील उमेदवार सदर करार करण्यास कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्यांची प्रशिक्षणाकरिताची उमेदवारी रद्द ठरविण्यात येईल. तसेच या प्रशिक्षणामधून मिळणाऱ्या कोणत्याही लाभास तो पात्र ठरणार नाही.

११) उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण सोडायचे असल्यास त्या उमेदवारास प्रशिक्षणादरम्यान त्याकरिता संस्थेने केलेला खर्च पुन्हा बार्टी संस्थेस द्यावा लागेल.

१२) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या हलगर्जीपणामुळे त्यांच्या होणाऱ्या नुकसानीस बार्टी संस्था उत्तरदायी राहणार नाही.

१३) सदर योजनेबाबत/प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी कडे राहतील.

**कागदपत्र पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रे –**

१. रु. १०० चा कोरा स्टँप पेपर

**२.** दहावी प्रमाणपत्र/जन्माचा दाखला (SSC certificate or Date of Birth Certificate )

**३.** पदवी प्रमाणपत्र (Certificate of Graduation)

**४.** जात प्रमाणपत्र ( Caste Certificate)

५. जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)

६. कौटुंबिक उत्पन्नाचा दाखला (Income Certificate of family (income from all the sources))

७. अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

८. परीक्षेचे प्रवेशपत्र (admit card)

९. आधार कार्ड/ओळख पत्र/पॅनकार्ड/ वाहन चालक परवाना (Driving License)/ निवडणूक ओळखपत्र

१०. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो

११. दिव्यांग करिता आरक्षित जागेकरिता ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

(सुनिल वारे)
महासंचालक, बार्टी, पुणे

ADVT/UPSC/14.07.2023